# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महोदय/महोदया,**

"माझी वसुंधरा" अभियानांतर्गत दि. ०१ जानेवारी, २०२१ रोजी हरित शपथ घेण्याबाबतचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांचे संदर्भ क्र. उशिसं/२०२०/माझी वसुंधरा/मवि-१/९०४७ दि. ३१/१२/२०२० रोजीचे पत्र सोबत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत प्रमाणे पाठविण्यात येत आहे.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत - वरील प्रमाणे

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 581
दिनांक- 31 DEC 2020

E:\Sm\Circular\Circular 2019.docx

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६१११९५३
क्रमांक : उशिसं/२०२०/माझी वसुंधरा/मवि-१/ ९०५७ दिनांक ३१.१२.२०२०

31 DEC 2020

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
२. कुलसचिव,
सर्व अकृषी /अभिमत / स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे,

**विषय - " माझी वसुंधरा " अभियानांतर्गत दिनांक १ जानेवारी,२०२१ रोजी हरित शपथ (#Epledge) घेण्याबाबत.**

**संदर्भ :** मा.श्री.आदित्य ठाकरे,मंत्री,पर्यटन,पर्यावरण व वातावरणीय बदल,राजशिष्टाचार यांचे दि. २३.१२.२०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडली आहे,अवलोकन करावे.संदर्भीय पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने दि.०१ जानेवारी २०२१ ते १५ जानेवारी २०२१ या कालावधीत माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरण रक्षणाच्या अनुषंगाने "हरितशपथ" घेण्याबाबत दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

तसेच सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी सदर आदेशान्वये दिलेल्या संबंधित सूचनांच्या अनुषंगाने संबंधित अकृषी / अभिमत/ स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे तसेच शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये / वसतीगृहे व परिसंस्था यांना आपल्या स्तरावरून तात्काळ सूचना देण्यात याव्यात व त्याबाबत कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.अजिता शिंदे)
कनिष्ठ प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय , उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत-मा.अभियान संचालक,माझी वसुंधराअभियान,पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग,महाराष्ट्र शासन,यांना माहितीस्तव

श्री.आदित्य ठाकरे
मंत्री
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल,
राजशिष्टाचार

महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई -४०००३२

# माझी वसुंधरा अभियान

क्रमांक :मावअ २०२०/ प्र.क्र.५/संचालनालय
दिनांक :२३ डिसेंबर, २०२०

विषय : "माझी वसुंधरा "अभियानांतर्गत दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी हरित शपथ (#Epledge) घेण्याबाबत.

संदर्भ : माझे दिनांक २५ नोव्हेंबर, २०२० चेपत्र.

महोदय,

निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित **माझी वसुंधरा अभियानाची** अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याबाबत सर्व संबंधित यंत्रणांना आदेश देवून या अभियानामध्ये अंतर्भूत असलेल्या विविध घटकांसाठी संबंधित विभागांच्या शासकीय योजनांच्या निधीच्या अभिसरणातून (Convergence) विविध उपक्रम राबविण्याबाबत व जिल्हास्तरावरील आढावा बैठकीत वेळोवेळी आढावा घेवून माझी वसुंधरा अभियानाला गती देण्याबाबत संदर्भीय माझ्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०२० च्या पत्रान्वये आपणास विनंती करण्यात आली आहे. त्यानुसार, आपण कार्यवाही करीत असालयाची मला खात्री आहे.

२. वसुंधरेच्या प्रती आपली जबाबदारी म्हणून राज्यातील प्रत्येक नागरीकांनी आपला सहभाग म्हणून, दिनांक १ जानेवारी, २०२१ ते १५ जानेवारी, २०२१ या कालावधीत माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरण रक्षणाच्या अनुषंगाने "हरितशपथ" (Earth Pledge म्हणजेच #Epledge) घ्यावयाची आहे. राज्यातील जास्तीत जास्त नागरीकांनी अशी हरित

शपथ घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून, आपण पालकमंत्री असलेल्या जिल्हयामध्ये नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजे दिनांक १ जानेवारी, २०२१ करोना संबंधातील सर्व प्रोटोकॉल विचारात घेवून छोटासा कार्यक्रम आयोजित करावा त्यामध्ये उपस्थित नागरीकांना नविन वर्षाच्या शुभेच्छा देवून आपण हरित शपथ घ्यावी. अशा प्रकारे घेण्यात आलेल्या हरित शपथेची नोंद www.majhivasundhara.in या वेब पोर्टलवर करण्यात यावी. तसेच, नागरिकांना सदर शपथ ऑनलाईनही घेता येणार आहे. जिल्हयामधील सर्व शासकीय निम-शासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालये यांनीही करोना संबंधातील सर्व प्रोटोकॉल विचारात घेवून ग्रुपने अथवा वैयक्तीकरित्या ऑनलाईन हरित शपथ घेण्याबाबत आपण आवाहन करावे, हि विनंती.

**आपलास्नेहांकित**

**(आदित्यठाकरे)**

**प्रति,**
**श्री.उदय रविंद्र सामंत**
**पालकमंत्री,**
**सिंधुदुर्ग जिल्हा**

**"माझी वसुंधरा" अभियान**
**दिनांक २ ऑक्टोबर,२०२० ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : अभियान-२०२०/प्र.क्र.१३४/तां.क.-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२०

प्रस्तावना:

निसर्गाशी असलेली कटिबद्धता निश्चित करण्यासाठी, निसर्गाशी संबंधित पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या पंचतत्वांवर पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग कार्य करीत आहे. **पृथ्वी** तत्वाशी संबंधित वनीकरण, वनसंवर्धन, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन व जमिनीचे धुपीकरण इत्यादी बाबींवर कार्य करणे. **वायू** तत्वाचे संरक्षण करता यावे म्हणून हवेच्या गुणवत्तेसाठी वायूप्रदूषण कमी करुन हवेच्या गुणवत्तेत सुधारणा करणे. **जल** तत्वाशी संबंधित नदी संवर्धन, सागरी जैव विविधता, जलस्त्रोतांचे संवर्धन व संरक्षण तसेच, सागरी किनारे यांची स्वच्छता करणे. **अग्नी** तत्वाशी संबंधित ऊर्जेचा परिणामकारक वापर, ऊर्जा बचत तसेच ऊर्जेचा अपव्यय टाळणे या बाबींना प्रोत्साहन देणे, अपारंपरिक ऊर्जेच्या निर्मितीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम, महामार्गाच्या दुतर्फा असलेल्या जागा, पडीक जमिनी, शेतांचे बांध या सारख्या जागांवर राबविणे आणि **आकाश** या तत्वास स्थळ व प्रकाश या स्वरुपात निश्चित करुन मानवी स्वभावातील बदलांसाठी जनजागृती व शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे जनमानसात बिंबवणे या प्रमुख बाबींचा समावेश आहे. निसर्गाच्या या पंचतत्वासोबत जीवन पद्धती अंगीकारल्याशिवाय आपण निसर्गासोबत जगू शकणार नाही आणि जैव विविधतेचेही अस्तित्व राहणार नाही. म्हणून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना सोबत घेवून तेथे या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित उपाययोजना करून शाश्वत निसर्गपूरक जीवनपध्दती अवलंबिण्यासाठी **"माझी वसुंधरा"** हे अभियान राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित **"माझी वसुंधरा" अभियान** हे राज्यातील खाली नमूद केलेल्या ६६७ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये **दिनांक २ ऑक्टोबर,२०२० ते ३१ मार्च, २०२१** या सहा महिन्यांच्या **कालावधीत राबविण्यास शासन मान्यता देत आहे.**

(अ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ३९५ (सूची "*परिशिष्ट-१*" मध्ये नमूद केल्यानुसार)

| | | |
|---|---|---|
| (१) | अमृत शहरे | ४३<br>(महानगरपालिका २७ व 'अ' वर्ग नगरपरिषदा १६<br>"*परिशिष्ट-१* (अ) " |
| (२) | नगरपरिषदा | २२६ "*परिशिष्ट-१* (ब)" |
| (३) | नगरपंचायती | १२६ "*परिशिष्ट-१* (क) " |

(अ) (ब) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : (ग्राम पंचायती) : २७२ (सूची "*परिशिष्ट-२*" मध्ये नमूद केल्यानुसार)

| | | |
|---|---|---|
| (१) | सन २०११च्या जनगणनेनुसार १०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायती. "*परिशिष्ट-२* (अ)" | २४६ |
| (२) | रायगड, रत्नागिरी व गोंदिया या जिल्हयांमध्ये १०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायती नसल्याने या जिल्हयांसाठी सदर अट शिथील करून या जिल्हयांमधील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायतीचा समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे. "*परिशिष्ट-२* (ब)" | २६ |

२. **संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सदर अभियान प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी संबंधित आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत व ग्रामसेवक, ग्राम पंचायत यांची राहील. तर,जिल्हयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रमुख म्हणून संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, जिल्हयाच्या ग्रामीण संस्थांचे प्रमुख म्हणून संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित महसूली विभागाचे प्रमुख म्हणून विभागीय आयुक्त यांनी त्यांचे विभागातील / जिल्हयातील स्थानिक संस्थांना प्रोत्साहन देवून त्यांच्याकडून सदर अभियानात उच्चत्तम कामगिरी करून घेण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.**

३. या अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी खाली दिलेल्या विगतवारीनुसार १५०० गुण ठेवण्यात आले आहेत:-

| विषय | पृथ्वी / Earth | वायू / Air | जल / Water | अग्नी / Energy | आकाश / Enhancement |
|---|---|---|---|---|---|
| गुण | ६०० | १०० | ४०० | १०० | ३०० |
| | | | एकूण गुण : १५०० | | |

उपरोक्त पंचतत्वांतर्गत राबवावयाच्या उपक्रमांचा विस्तृत तपशील खालील तक्त्यात नमूद केला आहे:

| अ.क्र. | अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी | |
|---|---|---|
| I | पृथ्वी | गुण |
| १ | **हरित अच्छादन आणि जैवविविधता** | |
| (अ) | अर्जदारांतर्फे राबविण्यात येणारे वृक्षारोपण अभियान : लावलेल्या झाडांची एकूण संख्या | १०० |
| (ब) | वृक्षारोपण अभियान कालावधीत लावण्यात आलेल्या भारतीय प्रजातीच्या झाडांची टक्केवारी | ५० |
| (क) | नव्याने केलेल्या हरित क्षेत्रांचा विकास (संख्या) (उदा. अमृत वने, सार्वजनिक उद्याने) | १०० |
| (ड) | जुन्या आणि नव्याने निर्मित केलेल्या हरित क्षेत्रांचे संवर्धन आणि देखभालीसाठी घेतलेल्या उपक्रमांची संख्या (जैवविविधतेच्या संवर्धनासह) | ५० |
| | एकूण | ३०० |
| २ | **घनकचरा व्यवस्थापन** | |
| (अ) | घनकचऱ्याचे संकलन, विलगीकरण व शास्त्रोक्त प्रक्रियेची टक्केवारी | १०० |
| (ब) | जुन्या साठलेल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया | ७५ |
| (क) | स्वयंपाकघरातील ओला कचरा कंपोस्टिंग करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणारे नाविन्यपूर्ण उपक्रम | ७५ |
| (ड) | शहराचा हागणदारीमुक्तीचा दर्जा | २५ |
| (इ) | प्लास्टिक कचरा व्यवस्थापन | २५ |
| | एकूण | ३०० |
| | पृथ्वी -एकूण | ६०० |
| | | |
| | | |

| अ.क्र. | अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी | गुण |
|---|---|---|
| II | वायू | |
| (अ) | पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालयाने मान्यता दिलेल्या प्रयोगशाळांमार्फत परिक्षण करण्यात आलेली वायू गुणवत्ता | ४० |
| (ब) | धूळ कमी करण्यासाठी रस्त्याच्या बाजूच्या जागेचे हरितीकरण | २० |
| (क) | ऊज्वला योजनेची व्यापकता (ग्रामीण) | ४० |
| (ड) | नागरी भागात नॉन मोटराइझ वाहतूकीस प्रोत्साहन (नागरी) | ४० |
| | वायु- एकूण | १०० |
| III | जल | |
| १ | **जलसंवर्धन** | |
| (अ) | जलसंवर्धनासाठी राबविण्यात येत असलेले उपक्रम | १०० |
| | एकूण | १०० |
| २ | **रेन वॉटर हारवेस्टिंग व परकोलेशन** | |
| (अ) | हाती घेण्यात आलेली रेन वॉटर हारवेस्टिंगची कामे | १०० |
| (ब) | रेन वॉटर परकोलेशनसाठी राबविण्यात येत असलेले उपक्रम | ५० |
| | एकूण | १५० |
| | | |
| ३ | **नदी, तळे व नाले यांची स्वच्छता** | |
| (अ) | नदी, तळे व नाले यांचे पुन:र्जिविकरण/ सौंदर्यीकरणासाठी हाती घेण्यात आलेले उपक्रम | ५० |
| | एकूण | ५० |
| | | |
| | | |
| ४ | **सांडपाणी, मैला व्यवस्थापन व प्रक्रिया** | |
| (अ) | मैला प्रक्रिया केंद्रात प्रक्रिया करण्यात येत असलेल्या सांडपाण्याचे प्रमाण | ५० |
| (ब) | मैला प्रक्रिया केंद्राच्या उभारणीसाठी प्रस्तावित मंजूर प्रकल्प | ५० |
| | एकूण | १०० |
| | जल -एकूण | ४०० |
| | | |
| | | |
| | | |